# नरेडकोकडून पूरग्रस्त शेतकऱ्यांसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीस ३.१२ कोटींचे योगदान



**मुंबई :** महाराष्ट्रातील शेतकरी बांधवांप्रती ऐक्याची भावना व्यक्त करत, नॅशनल रिअल इस्टेट डेव्हलपमेंट कौन्सिल (नरेडको) महाराष्ट्र यांनी राज्यभरातील पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी आणि पुनर्वसनासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीस ३.१२ कोटी रुपयांचे योगदान दिले आहे. या एकूण योगदानापैकी १ कोटी रुपये पुणे विभागातील सदस्यांनी दिले असून, उर्वरित रक्कम नरेडको महाराष्ट्राच्या मुंबई एमएमआर विभागातील सदस्यांनी एकत्रितरीत्या दिली आहे.

अलीकडील मुसळधार पाऊस आणि अचानक आलेल्या पुरामुळे कोल्हापूर, सांगली, सातारा, नाशिक, रायगड आणि रत्नागिरी यांसारख्या प्रमुख कृषी जिल्ह्यांमध्ये प्रचंड हानी झाली. शेतजमिनी उद्ध्वस्त झाल्या, घरे पाण्याखाली गेली आणि हजारो कुटुंबांना आपले आयुष्य पुन्हा उभे करण्यासाठी झगडावे लागत आहे. असंख्य शेतकऱ्यांचे महिन्यांचे परिश्रम आणि गुंतवणूक एका रात्रीत वाहून गेली, ज्यामुळे त्यांना आर्थिक आणि मानसिक संकटाला सामोरे जावे लागले. या परिस्थितीची गंभीरता ओळखून नरेडको महाराष्ट्रने राज्य सरकारच्या या प्रभावित शेतकरी कुटुंबांच्या पुनर्वसन मोहिमेला हातभार लावण्याचा निर्णय घेतला. सुमारे २० नरेडको महाराष्ट्र सदस्यांनी मिळून केलेले ३.१२ कोटी रुपयांचे हे योगदान शेतकऱ्यांना त्यांच्या पुनर्वसनासाठी, घरे पुन्हा उभारण्यासाठी तसेच आवश्यक सहाय्य पुरवण्यासाठी दिले गेले आहे. याप्रसंगी नरेडको महाराष्ट्रचे अध्यक्ष प्रशांत शर्मा म्हणाले, महाराष्ट्राचे शेतकरी आपले आदरणीय अन्नदाता आहे, आपल्या राज्याच्या अर्थव्यवस्थेचे कणा आहेत, जे लाखो लोकांना अन्न आणि बळ देतात. अलीकडील पुरामुळे केवळ पिके आणि शेतीचे नुकसान झाले नाही, तर अनेक कुटुंबांचा आत्मविश्वासदेखील डळमळीत झाला आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधीस दिलेल्या आमच्या या छोट्याशा योगदानाद्वारे आम्ही शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहण्याची आणि सरकारच्या अखंड प्रयत्नांना साथ देण्याची इच्छा व्यक्त करतो.